CMYK

बीड । रविवार
१३.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : १३
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१






# EVM हॅक होऊ शकते...!

## अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेच्या संचालक तुलसी गॅबार्ड यांचा गौप्यस्फोट

**वृत्तसंस्था**

भारतात वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम या इंटरनेट किंवा कोणत्याही नेटवर्कशी जोडलेल्या नसतात. त्या पूर्णपणे स्वतंत्र प्रणालीवर कार्य करतात आणि त्यामुळे त्यांचे हॅकिंग करणे अशक्य आहे, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

ईव्हीएम (इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन) हॅकींगबाबतचे आरोप हे भारतात वारंवार चर्चेचा विषय राहिले आहेत. महाराष्ट्रात काही महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीनमध्ये फेरफार केल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून केला जात आहे. इतकेच नव्हे तर इतर राज्यांमधूनही विरोधी पक्षांसह सामाजिक कार्यकर्त्यांकडूनही छेडछाड झाल्याचा आरोप करण्यात येतो. या सगळ्यात अमेरिकेच्या अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर संचालक तुलसी गॅबार्ड यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांबाबत (EVM) व्यक्त केलेल्या भूमिकेमुळे पुन्हा एकदा ईव्हीएमच्या सुरक्षिततेवर चर्चा सुरू झाली आहे. निवडणुकीत वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली हॅक केली जाऊ शकते. असा दावा तुलसी गॅबार्ड यांनी केला आहे. त्यांच्या दाव्यामुळे भारतात एकच खळबळ उडाली आहे.

माध्यमांशी बोलताना तुलसी गॅबार्ड म्हणाल्या की, मंत्रिमंडळाकडे असे पुरावे आहेत की ही प्रणाली दीर्घ काळापासून सायबर हल्ल्यांसाठी असुरक्षित आहे. काही निवडणुकांमध्ये निकालांमध्ये फेरफार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्यांनी अमेरिकेत सर्वत्र कागदी मतपत्रिकांचा वापर बंधनकारक करण्यात आला आहे. जेणेकरून मतदारांना निवडणूक प्रक्रियेबाबत विश्वास वाटू शकेल.

यासंदर्भात भारतीय निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण देत सांगितले की, गॅबार्ड यांनी मांडलेले मुद्दे भारतात वापरल्या जाणाऱ्या ईव्हीएम वर लागू होत नाहीत. भारतात वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम या पूर्णपणे 'स्टँडअलोन' असतात. त्या कोणत्याही प्रकारच्या इंटरनेट, नेटवर्क किंवा वायफायशी जोडलेल्या नसतात. त्यामुळे त्यांना हॅक करणे शक्य नाही.

भारतातील ईव्हीएम या अमेरिकेसह इतर देशांमध्ये वापरल्या जाणाऱ्या यंत्रांपेक्षा वेगळ्या आहेत. त्या संगणकीय प्रणाली नसून, त्या अधिक अचूक आणि कॅल्क्युलेटर सारख्या स्वयंपूर्ण प्रणालीप्रमाणे कार्य करतात. सर्वोच्च न्यायालयानेदेखील भारतीय ईव्हीएमच्या सुरक्षिततेवर शिक्कामोर्तब केले आहे. वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी वेळोवेळी या यंत्रांच्या कार्यपद्धतीची चौकशी केली असून, कोणतीही अनियमितता आढळलेली नाही.

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी आयोगाने एक विशेष व्यवस्था केली आहे. निवडणुकीपूर्वी मॉक पोल घेतला जातो, ज्यामध्ये सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित असतात. या चाचणीत मशीन योग्य प्रकारे कार्य करते की नाही हे प्रत्यक्ष तपासले जाते. पाच कोटींपेक्षा अधिक व्हीव्हीपॅट (ततझढ) स्लिप्स मोजल्या गेल्या असून, त्या मतदान नोंदींशी तंतोतंत जुळल्या आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारची गडबड किंवा तक्रार आढळलेली नाही, असंही आयोगाने स्पष्ट केले.

EVM बाबत होणारे आरोप

मतांचे फेरफार: काही नेत्यांचा आरोप असतो की ईव्हीएममध्ये आधीपासूनच एका विशिष्ट पक्षासाठी प्रोग्रामिंग ▶▶ उर्वरित पान २ वर

## संदीप क्षीरसागर यांच्याविरोधात जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण अद्याप शांत झालेले नाही. तोच बीड जिल्ह्यात दररोज कुठे ना कुठे मारहाण, धमक्या दिल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्यावर दोन महिन्यापुर्वी तहसिलदाराला धमकावल्याचा जुना व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाला होता. आता बीड नगरपरिषदेतील लेखापालाने त्यांच्याविरोधात जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार पोलिसांत दाखल केली आहे.

मी त्यांना भैय्या भैय्या म्हणत होते अन् ते मला शिव्या देत होते, असे म्हणत मी व माझे कुटुंब भयभीत झालो आहोत, असे लेखापाल गणेश तुळशीराम पगारे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. आपल्या स्वीय सहायकाच्या



फोनवरून कारे नुसतं गोड गोड बोलतो म्हणत संदीप क्षीरसागर यांनी शिवी दिली. तसेच मी बीडला आल्यावल मला भेटायला यायचं, असा दम त्यांनी भरल्याचे पगारे यांनी म्हटले आहे. परंतु ही धमकी नेमकी क्षीरसागर यांनी कोणत्या कारणामुळे दिली, हे मात्र अद्याप स्पष्ट झालेले नाही.

गणेश तुळशीराम पगारे हे बीड नगरपरिषदेत लेखापाल पदावर कार्यरत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री अजित पवार यांच्यासह पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे दिलेल्या लेखी तक्रारारीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीडचे विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांच्यावर जीवे मारण्याची धमकी देत शिवीगाळ केल्याचा आरोप केला.

माझ्या जीवाला धोका असल्याने मला व माझ्या कुटुंबियांना पोलीस संरक्षण देण्त यावे, अशी मागणी पगारे यांनी केली आहे. पगारे यांनी दिलेल्या फिर्यादीनूसार संदीप क्षीरसागर यांच्या स्वीय सहायकाच्या मोबाईलहून पगारे यांना धमकी देणारा फोन कॉल आला होता. पगारे गणेश तुळशिराम हे ▶▶ उर्वरित पान २ वर

## अडीच कोटींची फसवणूक; सायबर चोरट्याचं बीड ते दुबई अन् पाकिस्तानी नागरिकाशी कनेक्शन

**पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवडच्या सायबर पोलिसांनी ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीच्या संपर्कात असणाऱ्या गुन्हेगाराला बेड्या ठोकल्या आहेत. जेष्ठ नागरिकाची दोन कोटी ५२ लाख ९६ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक केली होती.

शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवून चांगला परतावा मिळून देण्याच्या आमिषाने फसवणूक केल्याची माहिती सायबर पोलिसांनी दिली आहे. आरोपी बाळासाहेब सखाराम चौरे हा बीड जिल्ह्यातील केज येथील राहणारा असून त्याचं थेट दुबईत राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकासोबत कनेक्शन



असल्याचं तपासात समोर आल आहे. सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फेसबुकच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक यांना जाळ्यात ओढलं. ऑनलाइन ट्रेंडिंग संदर्भात लिंक पाठवून व्हाट्सअप ग्रुप मध्ये ॲड केलं. एच.एस.बी.सी ट्रेंडिंग नावाचं प मोबाईल मध्ये डाऊनलोड करण्यास सांगितलं. अपद्वारे शेअर मार्केट आणि स्टॉक ▶▶ उर्वरित पान २ वर

## लेकीकडून परतताना ST मध्ये बसले, परळीत ऊसाचा रस प्यायला उतरले; चोरट्यांनी वयोवृद्ध जोडप्याचे १ लाखांचे दागिने पळवले




**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरहून परळीतील सोनपेठ येथे एसटीने प्रवास करणाऱ्या वयोवृद्ध जोडप्याचे प्रवासादरम्यान ९ लाखांचे दागिने चोरीला गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. माधुरी व त्यांचे पती सूर्यकांत परळकर हे छत्रपती संभाजीनगर येथे आपल्या मुलीकडे गेले होते. संभाजीनगर येथून एस.टी. बसने बीडला आले. एसटी बसने प्रवास सुरू असताना त्यांच्या पर्समधील ९ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना बीड-पारळी-सोनपेठ मार्गावर एसटी प्रवासादरम्यान घडली आहे. या दागिन्यांमध्ये नेकलेस,गंठण,मोहनमाळ व बोरमाळ हे दागिने लंपास झाल्याचे परळी संभाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दखल करण्यात आली आहे.

नक्की झाले काय ?

बीड येथून सोनपेठला जाण्यासाठी बीड - परळी बसने दुपारी १२.००० वा. बीड येथून निघून परळीला दुपारी सव्वा दोन ते आडीच वा.सुमारास बस स्थानकात आले. सोनपेठची बस गेली होती म्हणुन त्यांनी परळी बस स्थानकावर उसाचा रस घेतला व दुपारी ३ वाजताच्या सुमारास परळी - सोनपेठ बसने सोनपेठला गेले. घरी गेल्यावर बॅग तपासली असता बॅग मधील लाल पर्समध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने दिसले नाहीत. या पर्समध्ये ६ तोळे वजन असलेले ३ लाख रूपयाची एक मोहन माळ, ६ तोळे वजन असलेले ३ लाख रुपयांचे एक सोन्याची गंठण,चार तोळे वजनाचा २ लाख रुपयांचा एक लाल खडा असलेला नेकलेस आणि दोन तोळे वजनाची १ लाख ▶▶ उर्वरित पान २ वर

## उन्हाचा तडाखा ठरतोय जीवघेणा! बुलढाणा जिल्ह्यात उष्माघाताचा पहिला बळी




**बुलढाणा । प्रतिनिधी**

सध्या महाराष्ट्रात उन्हाचा पारा चांगलाच वाढलेला आहे. अनेक ठिकाणी तापमान ४० अंशांच्या पुढे गेलंय. याच उष्णतेमुळे पश्चिम विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात उष्माघाताचा पहिला बळी गेलाय. एका शाळकरी मुलाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडलीये.

सध्या राज्यात सूर्य चांगलाच तापलेला दिसतोय. तापमानाचा पारा वाढलेला असताना डिहायड्रेशनसह अनेक शारिरीक त्रास जाणवू लागलाय. उन्हाच्या झळा वाढल्याने बुलढाणा जिल्ह्यातील शेगावच्या एका शाळकरी मुलाचा उष्माघाताने मृत्यू गेलाय. वाढत्या उन्हाच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## लाडकी बहीण योजनेचा एप्रिलचा हप्ता कधी मिळणार? मोठी अपडेट आली समोर

**मुंबई । प्रतिनिधी**

महायुती सरकारची लाडकी बहिण योजना ही राज्यातील सर्वाधिक चर्चेची योजना आहे. लाडकी बहिण योजनेनेमुळेच महायुती सरकारला दुसऱ्यांदा राज्यात सत्ता मिळाली आहे. या योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या महिलांना दरमहा पंधराशे रुपये दिले जातात. फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचा हप्ता गेल्या महिन्यात म्हणजेच ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पात्र ठरणाऱ्या लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.

एप्रिल महिन्याचा हप्ता कधी मिळणार ?

दरम्यान आता या योजनेच्या पात्र महिला एप्रिल महिन्याचा हप्ता कधीपर्यंत खात्यात जमा




होणार अशी विचारणा होताना दिसत आहे. याच संदर्भात आता एक महत्त्वाची माहिती सुद्धा समोर आली आहे. लाडक्या बहीणींना एप्रिल महिन्याचा हप्ता अक्षय्य तृतीयेच्या मुहुर्तावर मिळणार असल्याची माहिती समोर येत आहे. या हप्त्यात लाभार्थ्यांची संख्या वाढणार की कमी होणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. स्क्रूटिनीनंतर आता किती लाभार्थी वगळले जाणार थोड्याच दिवसात समजणार आहे.

लाडकी बहिण योजनेतून अडीच लाखांच्या आत उत्पन्न असणाऱ्या महिलांना दीड हजार रुपये दिले जातात. जुलै २०२४ पासून या योजनेची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात सुरु झाली. आत्तापर्यंत लाडकी बहिण योजनेचे ९ हप्ते महिलांच्या खात्यात जमा करण्यात आले. मात्र अजून एप्रिलचा १० हप्ता मिळालेला नाही. मात्र मिळालेल्या माहीतीनुसार एप्रिलच्या महिन्याच्या ३० तारखेला लाडक्या बहीणांना त्यांचा हप्ता मिळणार असल्याची माहिती समोर येत आहे.

## ज्येष्ठांसाठी आरामदायी तीनचाकी; 15 रुपयांत 60 किमी प्रवास

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

दुचाकीसारखेच दिसते, पण आहे तीनचाकी वाहन. आसनव्यवस्था खुर्चीवर बसल्यासारखी आरामदायी. हे वाहन दीड युनिट विजेवर म्हणजे अवघे १५ रुपये खर्च येऊन तब्बल ६० किलोमीटर अंतर कापते आणि ते केवळ ६० वर्षांवरील ज्येष्ठांनाच विक्री केले जाते, असा दावा आहे. सध्या छत्रपती



संभाजीनगरवासीयांना दुचाकीसारख्या दिसणाऱ्या तीनचाकी वाहनाविषयी कमालीचे कुतूहल निर्माण झाले आहे

सिडकोच्या अपेक्स रुग्णालयाजवळ राहणारे ज्येष्ठ नागरिक अनंत मोताळे यांच्याकडे ही तीनचाकी पाहायला मिळते. अनंत मोताळे हे राज्य परिवहन महामंडळातून निवृत्त झाले आहेत. निवृत्तीनंतर ते अन्न वाचवा समितीचे काम करतात.

नव्या प्रकारच्या शोधून काढलेल्या त्यांच्या वाहनाबाबत मोताळे यांनी सांगितले, की बसण्यासाठी आरामदायी वाहन असावे, असा विचार सुरू होता. त्याचा समाज माध्यमावरून वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेतला. एक वाहन राजस्थानमध्ये असल्याचे दिसून आले. तेथे संपर्क केला. त्यांनी पुण्यात याची सोय करून देता येईल. तेथे जाऊन पाहावे लागेल, असे सांगितले. त्यानुसार पुण्यात जाऊन खात्री करण्यासाठी सध्याचे वाहन पाहून आलो. पुणेकर व्यावसायिकाने छत्रपती संभाजीनगरमध्येच सोय करून दिली.

एक लाख ६० हजार रुपयांचे हे तीनचाकी वाहन विजेवर चालणारे आहे. त्यासाठी दीड युनिट ▶▶ उर्वरित पान २ वर



# डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषयक धोरण

विश्वरत्न महामानव, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची उद्या १३४ वी जयंती. १४ एप्रिल १८९१ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा मध्यप्रदेशातील महू या गावी जन्म झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना १३४ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादनन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दीन दलीत, उपेक्षित, वंचित वर्गासाठी, महिलांच्या कल्याणासाठी घालवले. या वर्गासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जे कार्य केले ते सर्वांनाच माहीत आहे मात्र डॉ बाबसाहेब आंबेडकरांचे कार्य हे इतपतच मर्यादित नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा, मानववंश शास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र अशा अनेक क्षेत्रात बहुमोल कामगिरी बजावली. मात्र डॉ बाबासाहेब आबेडकरांनी देशाच्या अर्थशास्त्रात आणि जल धोरणात महत्वाची भूमिका बजावली हे खूप कमी लोकांना माहीत आहे. आज महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दर दोन वर्षांनी राज्यावर दुष्काळाची गडद छाया पसरते या वर्षीही राज्यावर किंबहूना देशावर दुष्काळाचे सावट आहे अशावेळी बाबासाहेबांच्या जलधोरणाची आणि त्याच्या अमंबजावणीची किती गरज आहे याची प्रकर्षाने जाणीव होते. देशाची जलनीती, दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुड धरण, सोननदी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी डॉ बाबासाहेब आबेडकरांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. आपल्या देशात जो पाऊस पडतो तो ठराविक कालावधीत म्हणजेच मोसमात पडतो. जून ते सप्टेंबर हा



आपल्याकडे पावसाचा मोसम समजला जातो कारण याच चार महिन्यात आपल्याकडे पाऊस पडतो म्हणून त्याला मोसमी पाऊस म्हणतात. या चार महिने पडणाऱ्या पावसावरच आपली शेती अवलंबून आहे. आपला देश कृषीप्रधान देश आहे जर या चार महिन्यात पुरेसा पाऊस झाला नाही तर त्याचा परिणाम आपल्या शेतीवर पर्यायाने देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. दुसरी बाब म्हणजे आपल्या देशात सर्वत्र सारखाच पाऊस पडतो असे नाही काही भागात धो धो पाऊस कोसळतो तर काही भागात पाऊसच पडत नाही. पावसाच्या विषम प्रमाणामुळे देशात एकाच वेळी काही भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य तर काही भागात अती पाऊस झाल्याने पूर जन्य परिस्थिती असे चित्र दिसते. पावसाच्या या लहरिपणाचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. निसर्गावर आपले नियंत्रण नाही मात्र पाण्याचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करून या संकटावर मात करता येऊ शकते हे बाबासाहेबांनी जाणले होते. २० जुलै १९४२ रोजी डॉ बाबासाहेब आबेडकरांनी मजूर मंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. त्यांचा व्हॉईसरॉय कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून समावेश करण्यात आला आणि त्यांच्याकडे श्रम, जलसिंचन आणि वीज हे विभाग सोपवण्यात आले. दुसऱ्या महायुध्दानंतरचे व्यापक विकासाचे धोरण सिंचन व वीज या विषयावर तपशीलवार धोरण तयार करण्यासाठी बाबासाहेबांनी पुढाकार घेतला. १९३५ च्या कायद्यानुसार श्रम विभागाने सिंचन व वीज विकासासाठी मुख्यत्वे तीन गोष्टी कार्यान्वित करण्याचे ठरले.

१) एकापेक्षा दोन राज्यात वाहणाऱ्या नद्यांचे नियंत्रण व व्यवस्थापन करणे

२) राज्यांमधील नद्यांवर पाणी व जल विद्युत ऊर्जा संपत्ती निश्चित करणे

३) शासकीय व तांत्रिक विकास करण्यासाठी राष्ट्रीय धोरण काय असावे ? या गोष्टींचा समावेश होता.

घटना तयार करतानाही बाबासाहेबांनी घटनात्मक तरतुदी करून ठेवल्या.

बाबासाहेबांनी घटनेचा आराखडा घटना समितीस सादर करताना पाणी हा विषय केंद्र शासनाच्या अख्त्यारीत असावा अशी भूमिका मांडली. बाबासाहेबांनी घटनेत पाणी हा विषय क्रमांक ५६ मध्ये अंतर्भूत केला त्यामुळे केंद्र शासनाला पाण्यासंबंधी कायदा करण्याचे अधिकार मिळाले. भारताच्या राज्यघटनेत ही तरतूद कलम २६२ मध्ये समाविष्ट करण्यात आली. याच तरतुदी अंतर्गत आंतरराज्य जलविवाद कायदा नदिखोर प्राधिकरण कायदा १९५६ पारित करण्यात आला.

नोव्हेंबर १९४५ मध्ये कटक येथे झालेल्या पाणी परिषदेत बाबासाहेबांनी अत्यंत मौलिक विचार देशाला दिले. पाणी आणि महापूर विनाशकारी आहे असे गृहीत धरून सुचवू नका. देशामध्ये एवढे पाणी उपलब्धच नाही की जे हानिकारक ठरू शकेल. भारतीय जनतेला पाण्याच्या कमतरतेमुळे जास्त कष्ट सोसावे लागतात. जास्त पाण्याच्या उपलब्धेमुळे नाही. पाणी राष्ट्रीय संपत्ती असल्यामुळे पावसाळ्यात पडणाऱ्या असमतोल पावसामुळे पुराच्या जास्त पाण्याविषयी तक्रार करण्यापेक्षा या पुराच्या पाण्याचा मनुष्याच्या विकासासाठी धरणे बांधून कसा उपयोग करता येईल हा दृष्टिकोन बाळगला पाहिजे. त्यामुळे जिथे पुरामुळे नुकसान होत असते त्या नद्यांवर ठिकठिकाणी धरणे बांधून हे पाणी समुद्राला जाऊ न देता विकासा साठी वापरणे इष्ट ठरेल असे विचार बाबासाहेबांनी मांडले होते. बाबासाहेबांच्या या विचाराने प्रभावित होऊन केंद्रीय जलमार्ग, पाटबंधारे, नौकायन आयोगाचे अध्यक्ष ए. एन. खोसला यांनी महानदिवरील बहुउद्देशीय विकास प्रस्तावावर बाबासाहेबांशी चर्चा करून हिराकुड धरणाची अमंबजावणी केली.

कटक येथील पाणी परिषदेत बाबासाहेबांनी मांडलेल्या विचारांची अमंबजावणी झाली असती तर आज पडणारा दुष्काळ पडला नसता. आज नदी जोड प्रकल्पाची जी संकल्पना मांडली जात आहे ती संकल्पना मूळची बाबासाहेबांचीच होती हे खूप कमी लोकांना माहीत आहे. ज्या समाजाला हजारो वर्ष पाण्यापासून दूर ठेवले त्याच समाजातील बाबासाहेबांनी देशवासीयांना मुबलक पाणी व वीज मिळावी यासाठी प्रयत्न केले. बाबासाहेबांशिवाय जल व्यवस्थापनाच्या बाबतीत इतका सखोल विचार कुणी केला नाही आणि दूरदृष्टीपणा दाखविलेला नाही आणि म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने देशाचे हितचिंतक ठरतात.

# शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी योग हा अत्यंत योग्य उपाय

नियमित योग केल्यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य वाढतं. तुम्ही आजकालच्या धावपळीच्या जीवनात स्वतःला फिट ठेऊ इच्छित असाल तर योग हा नक्कीच चांगला उपाय आहे.

योग करण्याचे फायदे

१) ताणतणावपासून मुक्ती आजकालच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकालाच तणाव असतो. पण नियमित योगा केल्यास, या ताणतणावपासून तुम्हाला मुक्ती मिळू शकते. तुम्ही सकाळी उठून रोज प्राणायाम आणि मेडिटेशन करत असाल तर तुम्हाला पूर्ण दिवस एनर्जी मिळते आणि तुमच्यामध्ये उत्साह कायम राहतो.

२) शरीरातील साखरेवर नियंत्रण– आजकाल लहान वयातदेखील लोकांना मधुमेह झालेला ऐकायला मिळतो. शरीरामधील इन्सुलीनचं प्रमाण घटलं की, साखरेचं प्रमाण वाढतं. मात्र रोज योगा केल्यामुळे साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

३) वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी– आजकाल खाण्याच्या पद्धती इतक्या बदलल्या आहेत की, त्याचा परिणाम शरीर लठ्ठ होण्यावर होत असतो. बऱ्याच जणांना ही समस्या असते. पण योगा केल्यामुळे तुमचं वजन नियंत्रणात राहातं. योगामध्ये अशी अनेक आसनं आहेत ज्यामुळे तुमची पचनक्रिया योग्य राहते आणि तुमच्या शरीरामध्ये चरबी साठू शकत नाही.

४) रक्ताभिसरण चांगलं होतं – योगामुळे शरीरातील रक्ताभिसरण वेगाने होण्यास मदत होते. शिवाय सर्वच अवयवांना योग्य व्यायाम मिळतो. यामुळे श्वासोच्छवास योग्य तऱ्हेने घेतला जातो आणि रक्ताभिसरण प्रक्रिया अप्रतिम होते.

५) म्हातारपणात आरोग्याच्या समस्या टाळण्यासाठी – तरूणपणी शरीर आपल्याला योग्य साथ देत असतं. कारण त्यावेळी कितीही आजार आला तरीही प्रकृती साथ देते. पण जसं वय वाढतं तशा तक्रारीही वाढतात. शरीरावरही मर्यादा येतात. त्यामुळे तुम्ही सुरुवातीपासूनच जर योगा करत असाल तर तुम्हाला म्हातारपणात आरोग्याच्या कमी समस्यांना सामोरं जावं लागतं.



## पान १ वरून पुढे...

### EVM हॅक....

केले गेले आहे, जेणेकरून मत देणाऱ्याने कोणत्याही उमेदवाराला मत दिलं तरी ते दुसऱ्याच पक्षाला जाईल.

इंटरनेट किंवा ब्लूटूथद्वारे नियंत्रण: काही वेळा असेही म्हटले गेले आहे की ईव्हीएममध्ये वायरलेस तंत्रज्ञान वापरून बाहेरून हस्तक्षेप करता येतो.

व्हीव्हीपॅट (VVPT) गोंधळ: मतदाराने दिलेले मत व्हीव्हीपॅट स्लिपवर दिसले तरी अंतिम मोजणीत त्या मताचा परिणाम नसल्याचा संशय काही वेळा व्यक्त केला जातो.

### संदीप क्षीरसागर...

नगरपरिषदेत लेखापाल म्हणून कार्यरतआहेत. ते शहरातील स्नेहनगर भागात कुटुंबियांसह राहतात. आज १२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी सव्वा नऊ वाजता आपल्याला आमदार संदीप क्षीरसागर यांचे तीन मिस कॉल आले. पण माझा फोन सायलेंट मोडवर होता आणि आज सुट्टी असल्याने मी झोपलो होतो, त्यातच माझ्या मुलाचा फोन त्यांचे आईला आला की खाली कोणी तरी लोक आले आहेत. मग मी झोपेतून उठुन बाहेर आलो तर चौरे नामक आमदार क्षीरसागर यांचे स्वीय सहायक आलेले होते. त्यांच्यासोबत दूसरे कोण होते त्यांना मी ओळखत नाही. मग मी चौरे यांना विचारले काय झाले ? तर ते म्हणाले आमदार साहेब बोलणार आहेत.

मी म्हणालो मी माझ्या फोनवरुन बोलतो तर ते म्हणाले नाही माझ्या फोनवरच बोला तर मी चौरे यांच्या फोनवर बोललो तर समोरून आमदार साहेब मला म्हणाले, की कारे नुसता गोड गोड बोलतो,आता मी बीडला आल्यावर लवकर माझ्याकडे यायचं असे म्हणत आर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. मी त्यांना सारखं भैय्या काय झाले मला सांगा, तर ते फक्त शिव्या व वार करण्याची भाषा करत होते.

मी घरी माझ्या कुंटुबाला सांगितले तर माझे कुंटुब भयभीत झालेले आहे. सध्या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरा करण्याचे दिवस असून आम्ही त्या आनंदात आहोत. परंतु, बीडचे आमदार मा. संदीप रविंद्र क्षीरसागर यांनी मला शिव्या दिल्यामुळे आम्ही भयभीत झालेलो आहोत, असे पगारे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. यावर संदीप क्षीरसागर यांच्याकडून अद्याप कुठलेही स्पष्टीकरण आले नाही. मात्र आमदाराच्या विरोधातच जीवे मारण्याची तक्रार दाखल झाल्याने पुन्हा एकदा बीड चर्चेत आले आहे.

### डीच कोटींची फसवणूक....

मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळू शकतो असं अमिश दाखवलं. पैसे भरण्यास त्यांना भाग पाडलं.

परंतु, गुंतवलेले पैसे परत मिळवण्यासाठी ब्रोकरेज फी, हाय ट्रान्झॅक्शन्स फी, सिक्युरिटी डिपॉझिट, थर्ड पार्टी ट्रांजेक्शन विड्रॉल प्लॅटफॉर्म असे वेगवेगळे चार्जेस भरण्यास भाग पाडून आत्तापर्यंत दोन कोटी ५२ लाख ९६ हजार रुपयांची फसवणूक केली. पैसे परतच मिळत नसल्याने अखेर याप्रकरणी ज्येष्ठ नागरिकांनी पिंपरी– चिंचवडच्या सायबर पोलिसांकडे धाव घेतली. प्रकरणाबाबत रीतसर तक्रार नोंदवण्यात आली.

कोट्यावधी रुपयांच प्रकरण असल्याने सायबर पोलिसांनी तात्काळ दखल घेतली आणि पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाला सुरुवात केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण स्वामी, सागर पोमन, वैभव पाटील, विद्या पाटील यांची पथक तयार करण्यात आली. वापरण्यात आलेले बँक खात्याचा तपास करण्यात आला. हे बँक खातं बीड जिल्ह्यातील असल्याचे तांत्रिक तपासात निष्पन्न झालं. बँक खाते धारकाला सायबर पोलिसांनी ताब्यात घेतलं. त्याच्याकडे अधिक तपास केल्यानंतर संबंधित खातं वापरत असलेल्या आरोपी बाळासाहेब सखाराम चौरे ला केज तालुक्यातील जीवाची वाडी येथून अटक करण्यात आली. आरोपीच दुबई कनेक्शन समोर आलं आहे. तेथे राहत असलेल्या गणेश काळे आणि पाकिस्तानी नागरिकाशी संगणमत करून बँक खाते त्यांना कमिशनच्या आधारावर देत असल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झालं आहे. आरोपी बाळासाहेब सखाराम चौरे हा दुबई, नेपाळ च्या आंतरराष्ट्रीय टोळीच्या संपर्कात असल्याचं उघड झालं आहे. या प्रकरणी अधिक तपास पोलीस निरीक्षक रविकरण नाळे हे करत आहेत.

### लेकीकडून परतताना...

रुपयांची जुनी बोरमाळ असे एकुण ९ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी माधुरी सुर्यकांत परळकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून परळीच्या संभाजीनगर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.परळी संभाजीनगर पोलिसांना याबाबत माहिती विचारले असता त्यांनी हा गुन्हा सोनपेठ पोलीस ठाण्याकडे वर्ग केल्याची माहिती दिली. सध्या सोन्याचा भाव ९६ हजारांच्या घरात गेला आहे.

### उन्हाचा तडाखा....

पार्श्वभूमीवर लहान मुलांची आणि ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

जागतिक हवामान तज्ञांनी अल निनोच्या प्रभावामुळे तापमानात वाढ होऊ शकते अशी शक्यता वर्तवली आहे. त्यामुळेच भारतातील बहुतांश भागात तापमान जोर धरू लागलंय.

उष्माघात ही एक गंभीर वैद्यकीय समस्या आहे. शरीराचे तापमान अचानक वाढल्याने आणि घाम येणे थांबल्याने ही समस्या उद्भवते.

उष्माघाताची काही प्रमुख लक्षणे

– शरीराचे तापमान 104°F (40°C) किंवा त्याहून अधिक असणे

– त्वचा लाल आणि कोरडी पडणे

– तीव्र डोकेदुखी, चक्कर येणे आणि भोवळ येणे

– मळमळ आणि उलटी होणं, श्वास घेण्यास त्रास, हृदयाचे ठोके वाढणे

बचावासाठी काय काळजी घ्याल

– भरपूर पाणी प्या आणि शरीर हायड्रेटेड ठेवा

– हलके आणि सैलसर कपडे परिधान करा

– दुपारच्या कडक उन्हात बाहेर फिरणे टाळा

– बाहेर जाणार असाल तर डोक्यावर टोपी किंवा स्कार्फ वापरा

– मद्यपान आणि चहा–कॉफीसारखी पेये टाळा.

बुलढाण्यात उष्माघातामुळे चिमुकल्याचा मृत्यूने उन्हाच्या धोक्याची जाणीव करून दिली आहे. त्यामुळे नागरिकांनी निष्काळजीपणा न करता योग्य ती काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

### ज्येष्ठांसाठी आरामदायी...

वीज खर्च होते. त्यातून ६० किलोमीटरचा प्रवास होतो. अत्यंत आरामदायी असल्याने प्रवासाचा थकवा जाणवत नाही. विशेष म्हणजे हे वाहन बसूनच मागे घेता येते. वाहनाची तशी रचना आहे. त्याचा ज्येष्ठांना अधिक लाभ होतो. वाहनाला मागील खुर्चीखाली सामान ठेवण्याचीही जागा आहे.

## पान ४ वरून पुढे...

### गुरु, संतांचा महिमा...

प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कीर्तनात निरुपण करताना काकडे महाराज म्हणाले, की सामान्यांपासून शास्त्रकारांपर्यंत अनेकांना गुरु व संतांचा महिमा कळालेला नाही, गुरु व संतांचा महिमा महान आहे, सद्गुरूंनी दाखवलेल्या मार्गावर चालल्यास आयुष्याचे कल्याण होते, गुरुने जवळ धरल्यास देवही दर्शन देतो, असेही काकडे महाराज म्हणाले. श्री क्षेत्र नारायण गडची परंपरा मोठी आहे, अवतारी पुरुष या नगद नारायणाच्या गादीवर बसलेले आहेत, हे संत आहेत आणि जगाच्या कल्याणा या संतांच्या विभूती असल्याचेही काकडे महाराज म्हणाले. असे गुरु मिळणे हे आपले भाग्य आहे, या गुरुंनी दाखवलेल्या सन्मार्गाने व भक्तीमार्गाने चालण्याचे आवाहन करून संत म्हणजे ब्रम्ह असल्याचेही यावेळी काकडे महाराज म्हणाले.

### "भक्ती प्रेमाविना...

कदम, ह.भ.प मनोज देव उमरी, ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज शास्त्री, ह.भ.प.परमेश्वर महाराज सोन्नाखोटा, ह.भ.प. गोपीनाथ महाराज धर्माळा, ह.भ.प.दादा भाऊ महाराज मेटे, बापूराव मेटे, कल्याण सक्राते, रामहरी काटकर, आश्रुबा भोसले, नामदेव भोसले, विष्णू चाळक, बबन राऊत, ओमकार देशमुख, दिलीप देशमुख, लक्ष्मण महाराज काकडे, व्यंकट कदम, प्रभाकर धुमक, अर्जुन महाराज आंधळे, मच्छिंद्र देव, धैर्यशील देशमुख, सरपंच सुरज पटाईत, शिवाजीराव भुजबळ, सखाराम कदम, पांडुरंग पवार, प्रा.जगन्नाथ पटाईत यांच्यासह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. काल्याची महाप्रसाद पंगती श्रीमान दिलीपराव सखाराम काळे यांची होती कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाबासाहेब पटाईत, राजेंद्र तात्या देशमुख, राजे बापु पटाईत,प्रकाश मामा जाधव,तुकाराम पटाईत,राजेभाऊ देशमुख,बप्पा बर्दापूरकर आदिंनी परिश्रम घेतले.

### ब्रह्मिभुत ढेकळे...

परिसरातील हजारो भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.ह.भ.प. भक्तीदास महाराज शिंदे यांच्या शुभहस्ते व ह.भ.प. परमेश्वर महाराज माने, ह.भ.प. दत्ता महाराज बडगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहामध्ये ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन,ह.भ.प. आचार्य भगवंत महाराज पुरी यांच्या मधुर आवाजात संगीत शिवपुराण कथा, हरिपाठ, शिवमहीम्न आदी कार्यक्रमाबरोबर, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज, ह.भ.प. भगवान महाराज शास्त्री, ह.भ.प. सत्यवान महाराज लाटे, ह.भ.प. राजू महाराज चोरडिया, ह.भ.प. परमेश्वर महाराज माने, ह.भ.प. भक्तीदास महाराज शिंदे, महंत स्वामी योगीराज महाराज, ह.भ.प. विष्णू महाराज तांदळे, ह.भ.प. अशोक महाराज शास्त्री आदी संत महांतांची कीर्तने झाली.

### विश्वरत्न डॉ बाबासाहेब...

आंबेडकर यांच्या प्रतिमेचे भव्य मिरवणूक होईल या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती देवगाव यांच्या वतीने करण्यात आलेले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात

### लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले जयंती साजरी




**लिंबागणेश । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त आज दि.११ शुक्रवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आबासाहेब हांगे तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे,पत्रकार हरीओम क्षीरसागर,प्रा.लेनाजी गायकवाड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षिका कुलकर्णी यांनी तर सूत्रसंचालन भरत चौरे यांनी केले. महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनाची महती वर्णन करताना सहशिक्षक अमर पुरी यांनी विद्येविना मती गेली! मतीविना नीती गेली!नीती विना गती गेली!गती विना वित्त गेले! वित्ताविना शुद्र खचले! इतके अनर्थ एका अविद्येने केले! महात्मा ज्योतिबा फुलेंनी जगाला दिलेल्या संदेशाची आठवण करून देत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंना साक्षर करून भारतातील पहिली स्त्री शिक्षिका बनवत शुद्रांसाठी शिक्षणासाठी केलेल्या संघर्षाची जीवनगाथा वर्णन केली.शिक्षणा बरोबरच थोर समाजसुधारक असलेल्या महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करुन शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्र स्थानी ठेवून पुरोगामी विचाराची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.त्याचबरोबर बालविवाहास विरोध, विधवा विवाहाला पाठींबा, अंधश्रद्धा निर्मूलन आणि महिलांना शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याचे कार्य केले असे प्रतिपादन केले.यावेळी सहशिक्षक संदिपान आगम,श्रीमती अयाचित व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

### बीडमध्ये आज भिम संगीत रजनी उपस्थित राहण्याचे समितीचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**



बीडमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने बीड शहरातील सेवादल मैदान येथे आज रविवार (दि.१३) एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता भव्य संगित रजनीचे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीने केले आहे. बीडच्या जयभीम महोत्सवात दरवर्षी विविध कार्यक्रमांची रेलचेल असते. त्या अनुषंगाने महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे यांचा संगित रजनी कार्यक्रम होणार आहे. तसेच रात्री १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सम ताज्योत रॅली काढण्यात येणार आहे. सदरील रॅली डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत काढली जाणार आहे. राज्याला आदर्श निर्माण करुन देणारी भिम जयंती बीडमध्ये साजरी केली जाते. ही भीम जयंती स्वबळावर साजरी होते.एकूण चौदा दिवस चालणारा हा जयभीम महोत्सव नावारुपाला आलेला आहे.एक आदर्श जयंती कशी असावी असा पायंडा भिम जयंतीने निर्माण केला आहे. दरम्यान आज पार पडणाऱ्या कार्यक्रमांना आंबेडकरी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

### के.एस.पी विद्यालय येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालय येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आला. या कार्यक्रमध्ये सौ. अंजलीताई शेळके, संस्थाध्यक्षा यांनी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले व पुष्पहार अर्पण केले. या वेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत गोड शब्दात व्यक्त केले. 'कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे' असे रोखठोकपणे बोलताना मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी शक्ती आहे. अशी त्यांची विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्याचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणूनही जोतीरावांचे दर्शन होते. 'नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे' हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते. अशा प्रकारे मुलांना अवगत करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख, तसेच शाळेतील , प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थित जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

# वेव्हज् 2025 साठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आढावा बैठक

**मुंबई । प्रतिनिधी**

दिनांक १ ते ४ मे २०२५ या कालावधीत मुंबई येथील जिओ कन्व्हेशन सेंटर, बी.के.सी. येथे वेव्हज् २०२५ परिषद अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट होणार आहे. या परिषदेचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, मुख्य सचिव सुजाता सौनिक तसेच केंद्रीय व राज्याचे वरिष्ठ अधिकारी यांच्या समवेत घेण्यात आला. या वेव्हज परिषदेस राज्य शासन पूर्णतः तयार असून वेव्हज् च्या माध्यमातून मोठी पावले उचलणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनानुसार भारताने क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये आघाडी घेत असून नेहमीप्रमाणे मुंबई क्रिएटिव्ह इकॉनॉमीचे नेतृत्व करायला तयार आहे, असे विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

वेव्हज् ही परिषद केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वेव्हजला कायमस्वरूपी एक सचिवालय स्वरूपात पुढे नेण्यात येईल. या परिषदेस एक कायम स्वरूप देऊन दरवर्षी हा कार्यक्रम घेतला जाईल. ज्याप्रमाणे ऑस्कर, कान्स किंवा दाओस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम सारखा आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयोजन केले जाते, अगदी त्याचप्रमाणे वेव्हज् याचेही दरवर्षी आयोजन केले जाईल. यासाठी एक समर्पित टीम वर्षभर काम करणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कल्पनेतून साकारलेल्या वेव्हज् या परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. सध्या तंत्रज्ञानाचे युग असून ते बदलणारे आहे. या नवीन बदलत्या तंत्रज्ञानाचे नेतृत्व महाराष्ट्राने करावे, यावर जोर देण्यात येत आहे. दृकश्राव्य तसेच मनोरंजन क्षेत्रात क्रिएटिव्ह इकॉनॉमीला एक प्लॅटफॉर्म देण्यात येणार आहे. मुंबई येथे होणाऱ्या या वेव्हज् परिषदेस १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम यापूर्वी झालेल्या जी – २० पेक्षा खूप मोठा असल्याचे त्यांनी सांगितले.

# राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या बीड जिल्हा कार्याध्यक्ष पदी विशाल पवार यांची निवड

**वडवणी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील रहिवासी श्री. विशाल शांतीलाल पवार यांची राष्ट्रीय बंजारा परिषदेचे समन्वयक धर्मनेता मा.किशनभाऊ राठोड, यांच्या आदेशाने,राष्ट्रीय अध्यक्ष विलासभाऊ राठोड,यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाराष्ट्र राज्याचे प्रदेश अध्यक्ष मा.भिकनभाऊ जाधव यांच्या स्वाक्षरीने बीड जिल्हा कार्याध्यक्ष पदी काल दि. १०/०४/२०२५ रोजी नियुक्तीकरण्यातआली आहे. सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रातील उलखने कार्य पाहता देशातील सर्वात मोठी संघटना राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी विशाल भैया पवार यांची नियुक्ती करण्यात आली कौशल्य लोकशाही मार्गाने कायद्याच्या माध्यमातून सामाजिक जनहित जोपासून संगणकांना उज्वल करण्यासाठी हा कार्याध्यक्ष पदाचा कारभार विशाल पवार यांना वरिष्ठांनी जाहीर केला.



विशाल पवार हे नाव गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्राचे बहुतांश भागात चर्चेत असणारे नाव बीड जिल्ह्यातील वडवणी येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्म लेल्या संत सेवालाल महाराजांचा इतिहास समजून सांगण्याचा भैयाचा कायमच प्रयत्न असतो. एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ हा विचार जागर महाराष्ट्रभर पेरत आहेत. येणार काळात राष्ट्रीय बंजारा परिषद संघटनेच्या माध्यम ातून महाराष्ट्रातील तरुणाला नक्कीच एका वेगळ्याच मार्गावर घेऊन जाणार आणि युवा शक्तीची हि ताकद राष्ट्राचे हितासाठी उपयोगी आणून प्रेरणा देईल असे मत विशाल पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. निवडी बद्दल कॉमेंट्स, सोशल मिडिया व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### जयभीम महोत्सवात चित्रकला स्पर्धा उपक्रम: नवोदित चित्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने शनिवार (दि.१२) रोजी महापुरुष भव्य चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या चित्रकला स्पर्धेला अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त शिक्षण संचालक शशिकांत हिंगोणीकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून उप शिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, अधिकक्षक शालेय पोषण आहार तुकाराम पवार, शिक्षण विस्तार अधिकारी भगवान सोनवणे, सूर्यकांत जोगदंड, अनिल डोंगरे, लक्ष्मीकांत अवढाळ, राजेंद्र खेडकर आदी उपस्थित होते. या भव्य चित्रकला स्पर्धे चे प्रास्तविक विजयकुमार समुद्रे, सूत्रसंचालन सुमेध जोगदंड,सुनिल डोंगरे, प्रा.अशोक गायकवाड यांनी मानले. दरम्यान जयभीम महोत्सवात आयोजित कार्यक्रम ांस जनतेने उपस्थित रहावे. असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

# आदित्य शिक्षण संस्थेत 210 जणांची मोफत मोतीबिंदू निदान, नेत्र तपासणी

**▸ आरोग्य दिनानिमित्त आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचा उपक्रम**

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य संघटनेच्या वतीने १ ते ७ एप्रिल हा आठवडा जागतिक अंधत्व जागृती सप्ताह म्हणून साजरा केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ.आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक ७ एप्रिल सोमवार रोजी आरोग्य दिनानिमित्त मोफत मोतीबिंदू निदान व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन आदित्य आयुर्वेद महाविद्यालय व आदित्य हॉस्पिटल यांच्या वतीने करण्यात आले होते.

या शिबिरात सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत तब्बल २१० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून मोतीबिंदूचे निदान करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन आदित्य दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिमांशू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा हे उपस्थित होते. व्यासपीठावर आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आंबाजोगाईतील नेत्र तज्ज्ञ डॉ. कोमल शर्मा, आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. विनोद राहिंज,डॉ. प्रगती राख, डॉ. मोहिते, डॉ. नागरे, डॉ. शिंदे, डॉ. अमोल मार्कंड, रामेश्वर ढोबळे, रुग्णालय इन्चार्ज शशिकांत काळे यांची उपस्थिती होती.यावेळी अंबाजोगाईतील प्रसिद्ध नेत्रविकार तज्ज्ञ डॉ. कोमल शर्मा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, आदित्य शिक्षण संस्थेने गोरगरीब लोकांसाठी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन खूप छान प्रकारे केले. त्याबद्दल कौतुक व्यक्त केले. त्यांना निमंत्रित केल्याबद्दल आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका आदिती सारडा आणि संस्थेचे त्यांनी आभार मानले.



**दर्जेदार सुविधांमुळे रुग्णांची विश्वासहार्ता वाढली**

**आदित्य आयुर्वेद महाविद्यालय व आदित्य हॉस्पिटल यांच्या वतीने रुग्णांना दर्जेदार सुविधा पुरवल्या जात आहेत. रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा म्हणून येथील डॉक्टर विद्यार्थी सेवा करत असल्याने रुग्णांची विश्वासहार्ता वाढत असल्याचे मोफत तपासणी शिबिराचा २१० रुग्णांनी घेतलेल्या लाभावरून दिसून येत आहे. –डॉ. आदिती सारडा, संचालिका आदिती शिक्षण संस्था, बीड**

# संस्कार विद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

संस्कार विद्यालयातील इयत्ता तिसरी चौथी विभागात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फ ुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम तिसरी चौथी विभागाचे विभागप्रमुख गिरी सर आणि कौंडण्य ताई यांच्या हस्ते महात्मा फुले आणि देवी सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तथा विभाग प्रमुख सुरेश गिरी सर यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फ ुले यांच्या जीवनकार्या विषयी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली, मार्गदर्शन केले. याप्रसंगी तिसरी चौथी विभागातील शिक्षकवृंद,कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम ाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन साळुंके ताई यांनी केले.

### दत्त संस्थान बालाघाट येथे चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरी होणार

**बीड । प्रतिनिधी**

श्री दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे शनिवार दि.१२ एप्रिल २०२५ रोजी प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने, दत्त उपासक श्री.वैजनाथ महाराज शिंदे यांच्या अधिपत्याखाली चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा होणार आहे. या जन्मोत्सव सोहळ्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तसेच मासिक पौर्णिमेनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेली आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्तांना नम्र विनंती आहे की या चैत्र शुद्ध पौर्णिमा व हनुमान जन्मोत्सवला उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा. असे आवाहन दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) व महादेव अण्णा शेलार रा.शिवाजीनगर (उदंडवडगाव) यांनी केले आहे.



# लातूरचे जिल्हा निबंधक सुनील शिरापूरकर यांच्या संपत्ती व कारभाराची चौकशी करण्यात यावी : मनसेची मागणी

**कारवाई न झाल्यास मनसे जिल्हा निबंधक कार्यालय समोर आंदोलन करणार् वर्षाताई जगदाळे**

**लातूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने लातूरचे जिल्हा निबंधक सुनील शिरापूरकर यांच्याविरोधात चौकशीची मागणी करत जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात शिरापूरकर यांच्या संपत्तीची व त्यांनी केलेल्या कामांची विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत चौकशी करण्यात यावी, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.

शिरापूरकर हे २०२३-२४ या वर्षात धाराशिव येथे जिल्हा उपनिबंधक पदावर कार्यरत असताना त्यांनी अनेक नियमबाह्य निर्णय घेतले, तसेच निकाल देण्यासाठी आर्थिक व्यवहार केल्याच्या तक्रारी आधीच



दाखल असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तरीदेखील त्यांना लातूर येथे जिल्हा निबंधक पदावर बढती देण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मनसेच्या महिला आघाडीच्या राज्य उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे यांनी दिलेल्या निवेदनात सांगितले की, शिरापूरकर यांच्या संपूर्ण संपत्तीची चौकशी झाली पाहिजे. त्यांच्या कार्यकाळातील निर्णयांची पुनर्तपासणी करावी व दोषी आढळल्यास त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करून गुन्हे दाखल करावेत. अन्यथा मनसेच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि त्याची सर्व जबाबदारी प्रशासनावर राहील.

ही मागणी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सहकार मंत्री, सहकार आयुक्त, लातूर जिल्हाधिकारी व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडेही पाठवण्यात आली आहे.प्रकरण गंभीर असून प्रशासनाने याची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

दैनिक ● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
रविवार, दि.१३ एप्रील २०२५ पान ४

## बस प्रवासात ९ लाखांचे दागिने लंपास

**परळी । प्रतिनिधी**

बीडहून परळी आणि परळीहून सोनपेठ असा एसटीने प्रवास करणाऱ्या सोनपेठ येथील रहिवासी असलेल्या वयोवृद्ध जोडप्याचे सोन्याचे तब्बल ९ लाखाचे दागिने चोरीला गेल्याची घटना (दि. १०) रोजी घडली आहे. याप्रकरणी परळीच्या संभाजीनगर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माधुरी सुर्यकांत परळकर (वय ६० वर्षे) रा. महाजन गल्ली सोनपेठ व त्यांचे पती हे छ. संभाजीनगर (उीळाश ) येथे आपल्या मुलीकडे गेले होते. (दि. १०) एप्रिल रोजी सकाळी संभाजीनगर-बीड-परळी - सोनपेठ या प्रवासा दरम्यान त्यांच्या बॅग मधून मोहन माळ किमंत ३ लाख रुपये, सहा तोळ्याचे गंठण किमंत ३ लाख रुपये, एक नेकलेस किंमत २ लाख रुपये, सोन्याची बोरमाळ १ लाख रुपये असे एकूण ९ लाखांचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी परळीच्या संभाजीनगर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पुढील तपास संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे करीत आहेत...

## थोडक्यात

### मुलाने दिला मुलीला मोबाईल, पित्याने जाब विचारताच लाकडी दांड्याने मारहाण

**केज । प्रतिनिधी**

पूर्वी प्रेम करणारे प्रेमीयुगुल हे एकमेकांच्या मनातील भाव आणि एकमेकांशी प्रेम पत्राच्या माध्यमातून संवाद साधत असत. त्याचाच संदर्भ घेवून प्र. के. अत्रे यांनी प्रेमाचा गुलकंद नावाची एक उपहासत्मक कवीला लिहिलेली आहे. मात्र केज तालुक्यात अशाच एका प्रेमविराने प्रेयसीला चक्क गुपचुप मोबाईल दिला. त्या मोबाईलचे बिंग फुटल्याने ' तिच्या' वडीलाने ' त्याला ' जाब विचारल्या नंतर त्या मुलाच्या वडीलाच्या भाच्याने आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी मुलीचे वडील व त्यांच्या कुटुंबीयांना मारहाण केली आहे. याबाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील एका गावात एका मुलीच्या वडिलांना त्यांच्या मुलीकडे मोबाईल आढळून आल्याने त्यांनी हा कोणाचा मोबाईल आहे ? आणि तुझ्याकडे कसा आला ? असे विचारल्या नंतर तिने गावातील तरुण अनिकेत दोडके याने दिला असल्याचे सांगितले. हे माहीत झाल्या नंतर मुलीच्या वडिलांनी अनिकेत दोडके याच्या घरी जावून त्याचे वडील बंडू दोडके व त्याच्या पत्नीला ते म्हणाले की, तुमच्या मुलाने माझ्या मुलीला मोबाईल का दिला ? असे म्हणताच बंडू दोडके याचा भाचा गणेश जगताप याने डोक्यात काठी मारून जखमी केले. तसेच भांडण सोडविण्यासाठी आलेले मुलीची आई, चुलता आणि नातेवाईकाला पण गणेश जगताप, सविता बंडु दोडके आणि अर्चना मुंकीद दोडके या तिघांनी मारहाण केली आणि पोलिसात तक्रार दिल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी मुलीच्या वडिलांच्या तक्रारी वरून गणेश जगताप, सविता दोडके आणि अर्चना दोडके या तिघांच्या विरुद्ध युसुफवडगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास जमादार सिताराम डोंगरे हे करीत आहेत.

### मराठा मावळा संघटनेच्या वकील सेलच्या बीड जिल्हाध्यक्षपदी ॲड.योगेश टेकाडे पाटील

**बीड । प्रतिनिधी**



मराठा मावळा महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माणिकराव शिंदे पाटील यांच्या सूचनेवरून तसेच मराठवाडा अध्यक्ष पंढरीनाथ गोडसे पाटील व जिल्हाध्यक्ष प्रदीप माने पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ड.योगेश टेकाडे पाटील यांची वकील संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यांचा स्थानिक ला असलेला जण संपर्क व सामाजिक कार्य करण्याची आवड लक्षात घेऊन त्यांना वकील सेलचे जिल्हा अध्यक्ष पद देण्यात आले आहे. निवड झाल्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# खरबुजाचे भाव घसरले !

## 23 रुपयावरून थेट 12 रुपयांवर, शेतकरी आर्थिक संकटात



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

खरबुजाच्या बाजारभावात लक्षणीय घसरण झाली आहे. पंधरवड्यापुर्वी २३ रूपये किलो असलेला भाव आज दि.१२ एप्रिल रोजी १२ रुपये किलोपर्यंत खाली आला आहे.यामुळे शेतकऱ्यांना खरबुज लागवडीवर झालेला खर्च वसूल करणे अवघड झाले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. उन्हाळ्यात थंडावा देणारे फळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खरबुजाची लागवड जानेवारीत झाली होती आणि मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून काढणी सुरू झाली आहे. रमजान महिना डोळ्यासमोर ठेवून अनेक शेतकऱ्यांनी खरबुजाची लागवड केली होती.परंतु मागणीच्या तुलनेत आवक वाढल्याने भावावर नकारात्मक परीणाम झाल्याचे पहावयास मिळाले. कुंदन जातीच्या खरबुजाला विशेष मागणी असली तरी रॉयल आणि विजय या जातीचे खरबुजही विक्रीसाठी बाजारात आलेले पहावयास मिळतात.

खरबुजाचे भाव निम्याने घसरले ; लागवडीवरील खर्च निघणं अवघड : दत्ता मोरे (खरबुज उत्पादक शेतकरी मसेवाडी ता.बीड) बीड तालुक्यातील बालाघाटावरील मसेवाडी येथील खरबुज उत्पादक शेतकरी दत्ता मोरे यांनी ३ एकर कुंदन वाणाच्या खरबुजाची लागवड केली. महिनाभरापूर्वी दीड एकर खरबूजाची विक्री करण्यात आली.तेव्हा २३ रुपये किलो भाव मिळाला. ऐन रमजानच्या शेवटच्या आठवड्यात निम्याने भाव कोसळले. कडक उन्हाळ्यात शेततळ्याचे पाणी देऊन कष्टाने आलेल्या खरबुज उत्पादनाचा खर्च सुद्धा निघणं अवघड झालंय.आम्ही घरचं ५ माणसं रानात राबणारे,खरबुज काढण्यासाठी ३०० रूपये मजुरीने आणलेले मजुर आणि कोसळलेले भाव त्यामुळे शेतकऱ्यांला कसं परवडणार अशी खंत शेतकरी दत्ता मोरे यांनी बोलून दाखवली.

# गुरु, संतांचा महिमा महान-काकडे महाराज

**● राक्षसभूवन येथे भाविकांची मांदियाळी, भक्तीमार्गाचे केले आवाहन**

**बीड । प्रतिनिधी**

गुरु हे सन्मार्ग दाखवतात तर संत भवसागरातून तारून नेतात... आपल्या जीवनात गुरू आणि संत यांचा महिमा महान आहे, अशा शब्दात हभप चांगदेव महाराज काकडे यांनी गुरु व संतांचा महिमा विषद केला, ते श्री क्षेत्र नारायण गडच्या राक्षसभूवन येथे सुरू असलेल्या सप्ताहातील कीर्तनात बोलत होते. यावेळी त्यांनी भाविकांना भक्तीमार्गाचे आवाहन केले. यावेळी महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज, उत्तराधिकारी महंत संभाजी महाराज यांच्यासह भाविकांची मोठी उपस्थिती होती.

या हरी कीर्तनास हभप भानुदास महाराज शास्त्री, नारायण महाराज डिसले, रंगनाथ महाराज सुरळेगावकर, सिद्धेश्वर महाराज गाडे, श्रीरंग महाराज डोंगरे, सत्यवान महाराज लाटे, गोरक्ष महाराज भिल्लारे, गोरख महाराज कोकाटे, विठ्ठल महाराज गलधर, हरी महाराज गवते, लक्ष्मण महाराज तकीक, ब्रम्हदेव महाराज नवले, नारायण गड संस्थानचे विश्वस्त सी. ए. बी. बी. जाधव, गणेशराव नलावडे, दिलीप अण्णा गोरे, महादेव तुपे, गोवर्धन काशीद, बळीराम गवते, राजाभाऊ मस्के, समाधान महाराज शर्मा आदींची

▶▶ उर्वरित पान २ वर



*श्री क्षेत्र नारायण गडचे भक्त गणेश नलावडे यांनी महाप्रसादासाठी २५ क्विंटल साखर दिली. सप्ताह कमेटीच्या वतीने नलावडे यांचा सत्कार करण्यात आला.*

### राक्षसभूवन ग्रामस्थांचे चोख नियोजन

**राक्षसभूवन येथे होत असलेल्या नारळी सप्ताहसाठी गेल्या अनेक दिवसांपासून ग्रामस्थ रात्रंदिवस मेहनत घेत आहेत. आता सप्ताहात भाविकांची मांदियाळी आहे. राज्यभरातून आलेल्या भाविकांसाठी चहा, पाणी, नाष्टा, जेवणापासून ते अंघोळ, स्वच्छता अशा सर्वच बाबतीत राक्षसभूवन व परिसरातील ग्रामस्थांनी एकत्र येत चोख नियोजन केल्याचे दिसून येत आहे. स्वयंसेवकांचा सेवाभाव पाहून उपस्थितांना कृतकृत्य वाटत आहे.**

# "भक्ती प्रेमाविना सुख नाही" : ह.भ.प महंत श्रीराम महाराज विडेकर

**● वडा येथिल अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता**

**केज । प्रतिनिधी**



जोपर्यंत भक्तीमध्ये प्रेम नाही,तोवर खरे नाही सुखही नाही. केवळ बाह्य कृतींनी (जसे की पूजा,जप,व्रत) भक्ती केली तरी ती प्रेमाशिवाय अपुरीच राहते,खरे सुख हे त्या भक्तीतून मिळते ज्यात निःस्वार्थ प्रेम, समर्पण आणि आपुलकी असते.या करिता भक्ती मार्गाचे पिसे/वेड लागले पाहीजे असे प्रतिपादन महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी विडा येथे प्रतिवर्षाप्रमाणे आयोजित श्री राजा हनुमान महाराज जन्मोत्सवानिमित्त नाम सप्ताहातील सांगता समारंभाच्या काल्याच्या किर्तना प्रसंगी केले आहे.

माझे गडी कोण कोण ।<br>
निवडा भिन्न यांतुनी ।।<br>
आपआपणामध्यें मिळो ।<br>
एक खेळों एकाशीं ।।ध्रु.।।<br>
घाबरियांच्या मोडा काड्या ।<br>
धाडा भाड्यां वळतियां ।।<br>
तुका म्हणे देवापाशीं ।<br>
विटाळशी नसावी ।।

या जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या खेळ प्रकरणातील अभंगावर निरुपण करताना येथे जमलेल्या खेलगाड्यांपैकी माझे गाड़ी कोण, ते निवडून वेगळे करा, आपण आपल्या स्वभावाशि जुळणारे एकत्र येवू व एकमेकांशि खेळु,जे जे भक्तिचा खेळ खेळायला घाबरतात, त्यांच्याशी काडीमोड करा, त्यांना खेळातून बाहेर काढ़ा असे आव्हान भगवंत आपल्या भक्तीप्रेमातील सवंगड्यांना करतात असे सांगीतले. या प्रसंगी ह.भ.प. अरुण महाराज

▶▶ उर्वरित पान २ वर

# ब्रह्मिभुत ढेकळे महाराजांनी लावलेलं रोपट गगनाला गेलं : महंत लक्ष्मण महाराज मेंगडे

**● मौजे बेलखंडी येथील ४७ व्या नामसप्ताहाची उत्साहात सांगता**

**वडवणी । प्रतिनिधी**



मौजे बेलखंडी येथील प्रसिद्ध श्री. क्षेत्र बेलखंडेश्र्वर महादेव संस्थान जागृत देवस्थान असून, संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. संत परंपरेचा वारसा असलेल्या या गावाला ब्रह्मिभूत, गु. साहेबराव महाराज ढेकळे यांनी सुरू केलेला अखंड हरिनाम सप्ताहाला आज ४७ वर्षे पूर्ण झाली. लवकरच या नाम सप्ताहाचा रौप्य महोत्सव होत असून, ब्रह्मिभूत ढेकळे महाराजांची लावलेलं नामाच हे रोपट गगनाला गेलं. असे गौरोद्गार सप्ताहाचा सांगता प्रसंगी श्री. क्षेत्र बंकटस्वामी संस्थांचे मठाधिपती महंत ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी व्यक्त केले.

शेकडो वर्षापासून भंडारा स्वरूपात याठिकाणी नाम महोत्सवाची परंपरा होती. त्यांनतर ब्रह्मिभूत ढेकळे महाराजांनी या ठिकाणी येऊन अखंड हरिनाम सप्ताहाची सुरवात केली. परिसरातील भक्तांना भगवंतांच्या नामाची गोडी लावली, ढेकळे महाराजांची ३५ वी पुण्यतिथी व सप्ताहाला आज ४७ वर्षे पूर्ण झाली. आज या नामसप्ताहाची उत्साहात सांगता झाली.

▶▶ उर्वरित पान २ वर

# विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती देवगाव यांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन



**● कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आव्हान**

**वडवणी । प्रतिनिधी**

भारत देशातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या थाटामाटात साजरी होणार आहे. भारतीय राज्यघटनेचा भारत देशालाच नव्हे तर जगाला हेवा वाटावा असा हा ग्रंथ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहून या भारताला जगाचा नकाशावर नेऊन ठेवले आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय इतिहासातील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व आहेत ज्यांनी शिक्षण व राजकारणाचा क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले त्यांनी जगातील काही प्रतिष्ठित संस्था म्हणून शिक्षण घेतले जात मुंबईतील एलिफन्टन कॉलेज युके मधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ यांचा समावेश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा मूलमंत्र देत बहुजनांना उन्नती आणि समाजोद्धाराचा मार्ग दाखवला. सामाजिक न्याय व समतेचा पुरस्कार करत समाजातील उपेक्षितांसाठी संघर्ष करणारे महामानव, प्रज्ञासूर्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती दिनी विनम्र अभिवादन!

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथे विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्यावतीने नियोजन केलेले आहे

दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ठीक आठ वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण होईल. तसेच मंगळवार दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजता महाराष्ट्रात सर्वत्र गाजत असलेले तुफान विनोदी समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराजांचे शिष्य इंजिनीयर पवन महाराज दंवडे यांचा कार्यक्रम होईल

मंगळवारी सायंकाळी आठ वाजता बक्षीस वितरण होईल त्यामध्ये निबंध स्पर्धा चित्रकला स्पर्धा गावची एक लाडकी लेक लक्की ड्रॉ कन्यादान योजना मंगळवारी ठीक आठ वाजता कार्यक्रम होईल

व तसेच बुधवार दिनांक २३ एप्रिल २०२५ सायंकाळी पाच वाजता विश्वरत्न डॉ बाबासाहेब

▶▶ उर्वरित पान २ वर

